# बृहन्मुंबई महानगरपालिका

## घन कचरा व्यवस्थापन, पी/दक्षिण

**सहा.अभि.(घकव्य)/ 5925 /पी/दक्षिण दिनांक 09/10/2026**

# <u>सूचना</u>

विषय: पी दक्षिण/विभागातील स्मशानभूमी मधील दैनंदिन साफसफाईच्या कामाकरीता बहुउद्देशीय कामगारांचा पुरवठा करण्याकरीता अशासकीय संस्था/कंपनी यांची नेमणूक करणेबाबत.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अशासकीय संस्था /कंपनी यांना याव्दारे सुचित करण्यात येते की, विषयांकित कामाकरीता भविष्य निर्वाह निधी व राज्य कर्मचारी विमा योजनेमध्ये नोंदणीकृत असणा-या तसेच 01 वर्षाचा विशिष्ट(particular) कामाचा अनुभव असलेल्या अशासकीय संस्थेची/कंपनीची 168 दिवसांकरीता बहुउद्देशीय कामगारांचा कंत्राटी पध्दतीने पुरवठा करण्याकरीता इच्छुक अशासकीय संस्था/कंपनी यांच्याकडून मोहरबंद इच्छापत्र मागवित आहोत.

अर्ज तसेच योजनेच्या अटी व शर्ती सहाय्यक अभियंता (घकव्य) पी/दक्षिण ह्यांच्या कार्यालयात रु.3993/- अधिक 18% जीएसटी रोखीने दि. 10 ऑक्टोबर, 2026 ते दि. 13 ऑक्टोबर, 2026 रोजी सकाळी 11:00 ते दुपारी 04:00 वाजेपर्यंत व दि. 14 ऑक्टोबर, 2026 रोजी सकाळी 11:00 ते दुपारी 01:00 वाजेपर्यंत विकत मिळतील. इच्छूक अशासकीय संस्थांनी/कंपन्यानी आपले अर्ज सहाय्यक अभियंता (घकव्य) पी/दक्षिण ह्यांच्या कार्यालयात दि.14 ऑक्टोबर, 2026 रोजी दुपारी 03:00 वाजेपर्यंत सादर करावेत. नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधीनंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाही.

योजनेच्या अटी व शर्ती नुसार पात्र ठरलेल्या संस्था/कंपन्यापैकी 03 संस्थांची/कंपनीची दि. 14 ऑक्टोबर, 2026 रोजी दुपारी 05:00 वाजता **सोडत पद्धतीने** सदर कामाकरीता निवड करुन कामाची संधी देण्यात येईल. सदर सोडतीस पात्र संस्थांच्या अध्यक्षांस / सचिवास / खजिनदार पैकी कोणत्याही एकास आणि कंपनीचे मालक(Proprietor) उपस्थित रहाणे **बंधनकारक** असेल. सोडती बाबत सर्व अधिकार महानगरपालिका राखून ठेवत आहे.

**सही/-**
**सहा.अभि.(घकव्य)पी/दक्षिण**